## निशाणी क्र.५ खाली आदेश

१. सदर अर्ज वादीने दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.३ यांनी दि.१७/७/२०१४ रोजी दिलेल्या नोटीस नूसार, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी दि.३०/६/२०१४ रोजी दावा मिळकतीचा कब्जा काढून घेण्याकरीता कार्यवाही करु नये किंवा वादीकडून कब्जा काढून घेण्यात येईल असे कृत्य करु नये म्हणून तुर्तातुर्त ताकिद मिळणेकरीता अर्ज केला आहे.

२. वादीने यामध्ये नमूद केले आहे की, गट क्र.३३५ हा दाव्याचा वाद विषय आहे. गट क्र.३३५/१अ व गट क्र.३३५/१ब, ३३५/२अ, ३३५/२ब हे नंतर पडले. त्याआधी मूळ गट क्र.३३५ असा होता. मूळ गट क्र.३३५ व ६८५ यांची वाटणी होऊन मिळण्याकरीता मारुती गांजाळे यांनी त्यांच्या भावांविरुध्द वाटपाचा दावा दाखल करुन त्यामध्ये प्रत्येकी १/५ हिस्सा वादी व त्यांच्या ४ भावांस न्यायालयातून ठरविण्यात आला. त्यानुसार दरखास्त दाखल झाल्यावरुन अंमलबजावणी होऊन मारुती यास गट क्र.३३५ पैकी दक्षिण बाजूचा १/५ हिस्सा मिळाला. त्यानंतर सुभद्रा व भागू यांनी नि.दि.दावा क्र.८९/१९९५ दाखल करुन पाचही भावांविरुध्द वाटणी मागितली असता प्रत्येक वादीचा १/४२ वा हिस्सा मूळ गट क्र.३३५ व ६८५ मध्ये जाहीर करण्यात आला. निकालाविरुध्दचे अपिल खारीज करण्यात आले. त्यावरुन सुभद्राबाई यांचे वारस बाबू व आबा यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे कब्जा मिळण्यासाठी दरखास्त अर्ज दिल्यावर त्यानुसार तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी मोजणी करुन, तक्ता तयार करुन तहसिलदार यांना पाठविला. परंतु मोजणीचे नोटीस संबंधितांना दिले नाही व मयतांच्या वारसांना नोटीस दिल्या नाहीत. तहसिलदारांनी देखील सदर वाटप तक्ता संबंधितांना किंवा मयताच्या वारसांना दिले नाही व वादींनाही दिल्या नाही व मयताच्या वारसांच्या गैरहजेरीत काम चालले. दरखास्तीत तक्रार झाली नाही म्हणून त्याबाबत दखल घेण्यात आली नाही व वाटप तक्ता मंजूर केल्याचे वादी क्र.१ यास कळविण्यात आले. त्याविरुध्द आरटीएस अपिल वादी क्र.१ ने दाखल केले असून ते

चालू आहे. त्यादरम्यान तहसिलदार यांनी दि.३०/६/१४ रोजी नोटीस काढून दि.१७/७/१४ रोजी कब्जा देणार असल्याचे कळविले. परंतु दिवाणी दावा क्र.८९/९५ मधील वाटप तक्ता चुकीचा तयार केलेला आहे. त्यामुळे ०.९० आर क्षेत्र सुभद्राबाईच्या वारसास वाटणीत देण्यात आला. त्याचप्रमाणे १/४२ असा हिस्सा नियमित दिवाणी दावा क्र.८९/९५ नुसार विचारात घेतला नाही. याउलट वादीने दि.२२/८/२००८ रोजी गट क्र.३३५/२ च्या उत्तर–पश्चिम बाजूने १/४ हिश्याचे कृष्णा यमाजी गांजाळे यांच्या हिश्याचे क्षेत्र नोंदणीकृत खरेदीखताने घेतले, सदर मिळकतीचे खरेदीखत कृष्णा गांजाळे यांनी वादी क्र.२ यांचे नावे लिहून दिले आहे. त्यानुसार वादी क्र.२ चा हिस्सा आहे. वादी क्र.२ हा वादी क्र.१ चा मुलगा असून ते जमीन वहिवाटीत आहेत. त्यानुसार फेरफार झालेली आहे. परंतु त्यास हरकत घेतलेली नाही. सदर जमीन बागायत केली आहे व त्यामध्ये गळीतास जाणारा ऊस आहे. दरम्यान प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी खरेदी घेतलेल्या जमीनीपैकी ०.९० हे. आर क्षेत्राचा ताबा घेणार असल्याचे नोटीसीने कळविल्याने वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल व कब्जा जाईल त्यामुळे तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र.४अ ते ५अ यांनी नि.क्र.३३ वर म्हणणे देऊन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले की, प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर न्यायालयामध्ये नि.दि.दा.क्र.३७७/८८ दाखल केला होता. सदर दावा दि.२८/५/१९९५ रोजी नामंजूर झाला. त्याविरुध्द प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी ८९/१५ हे अपिल दाखल केले होते. त्या अपिलामध्ये चौकशी होऊन प्रतिवादी क्र.४ ते ५अ यांना दावा मिळकतीपैकी प्रत्येकी १/४२ हिस्सा सरस निरस वाटप होऊन घेण्याचा हक्क देण्यात आला. त्याविरुध्द वादींनी मा. उच्च न्यायालयामध्ये २रे अपिल क्र.८९०/०४ दाखल केले परंतु पावले न उचलल्याने ते काढून टाकण्यात आले. त्यानंतर जिल्हा न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार जिल्हाधिकारी यांच्याकडे नियमित दरखास्त क्र.९/११ दाखल झाली त्यानुसार वादी, प्रतिवादी व वारसांना नोटीस काढून मोजणीचे काम पूर्ण झाले.

भूमी अधिक्षक पंढरपूर यांनी मोजणी तक्ता तहसिलदा यांच्याकडे पाठविला. त्यावर चौकशी करुन तहसिलदार यांनी सदरची दरखास्त दि.३०/१/१४ रोजी मंजूर केली. सदर मिळकतीचा कब्जा देण्याकरीता दि.१७/७/१४ रोजी पक्षकार वादी व प्रतिवादींना आदेशिका काढल्या आहेत. त्याविरुध्द आरटीएस अपिल क्र.२१२/१४ दाखल झाले, परंतु ते दि.१५/४/१५ रोजी नामंजूर करण्यात आले. त्याविरुध्द २रे अपिल जिल्हाधिकारी यांच्याकडे ११५/०२ नुसार दाखल असून त्याचे कामकाज प्रलंबित आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे दि.२२/८/०८ रोजी गट क्र.३३५/२ या जमीनीच्या उत्तर-पश्चिम बाजूचे १/४ हिश्याचे कृष्णा गांजाळे यांच्याकडून खरेदी घेतली असे वादी क्र.२ चे म्हणणे आहे परंतु, त्यांच्याकडे कब्जा नसताना त्यांनी बेकायदेशीर वादी क्र.२ यांना विक्री केली आहे. कारण कायदेशीर वाटप सरस निरस मानाने झालेले नाही. अशा परिस्थितीमध्ये तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

४. वादीने त्याच्या अर्जाला दूजोरा देण्यासाठी पूढील कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. दाव्यात नमूद मिळकतींची ७/१२ उता-याच्या प्रमाणित प्रती,

२. प्रतीवादी क्रमांक २ याने दिलेली नोटीस.

५. प्रतीवादींनी कोणतेही कागदपत्रे दाखल केली नाहीत. दोन्ही बाजूंना युक्तीवाद करण्याची वारंवार संधी देऊनही, दोन्ही बाजूंनी युक्तीवाद न केल्याने, सदर अर्ज आदेशाकरीता ठेवण्यात आला. त्यानुसार पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

६. वादीच्या बाजूने तुर्तातुर्त मनाई हुकूम अर्ज मंजूर करण्याकरीता, वादीने प्रथमदर्शनी तथ्य, सोईचे पारडे त्याच्या बाजूने आहे तसेच अर्ज मंजूर न केल्यास त्याचे अपरिमित नुकसान होईल ही बाब अभिलेखावर दाखवून देणे गरजेचे आहे. अभिलेखाचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, वादींनी आधीच्या दाव्याचे

किंवा त्यांच्या ताब्यात दावा मिळकती कशा आल्या हे दाखविण्यासाठी कोणतेही कागदपत्रे ७/१२ उतारे वगळता दाखल केलेली नाहीत. त्यामूळे आधीच्या दाव्याच्या अनूषंगाने झालेल्या वाटपाने वादीच्या ताब्यात दावा मिळकती आहेत हे दिसून येत नाही. तसेच आधीचे वाटप झाले होते व त्याअनूषंगाने वाटप होउन वादी क्रमांक १ हा ताब्यात होता व नंतर त्याने ती वाद जागा वादी क्रमांक २ यांना विकली, त्याअनूषंगाने देखील अभिलेखावर काहीही आलेले नाही. त्याप्रमाणे वादीने अभिलेखावर साल १९९५ मध्ये सुभद्राबाई यांनी नियमित दिवाणी दावा क्र.८९/१९९५ बाबत काहीही अनुतोष न मागता, त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.२ व ३ ने केलेली कार्यवाही थांबविण्याकरीता सदर अर्ज दिलेला आहे. वादीने अभिलेखावर असा कुठलाही दस्त किंवा तथ्य आणलेला नाही ज्याने दावा गट क्र.३३५ किंवा ६८५ च्या ताब्यात होत्या हे दिसून येईल. अशावेळेस प्रतिवादीने केलेली कार्यवाही ही बेकायदेशीर आहे हे दाखविण्यासाठी वादीने काहीही तथ्य पुढे आणलेले नाही व कुठलेही कागदपत्रे दिलेले नाहीत. अशावेळेस प्रथमदर्शनी तथ्य वादीच्या बाजूने नाही, तसेच सोईचे पारडे व अपरिमित नुकसान दिसून येत नाही. कारण दि.३०/६/१४ रोजीच्या नोटीसचे अवलोकन केले असता त्यामध्ये नि.दि.दावा क्र.८९/९५ मधील मंजूर झालेल्या वाटप तक्त्याच्या आधाराने कार्यवाही करायचे आहे असे नमूद केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याकरीता नोटीसीने बजावले होते. परंतु सदर वाटप तक्ता हा बरोबर नाही हे दाखविण्यासाठी वादीने आरटीएस अपिल केलेले आहे व ती प्रलंबित आहे ही बाब अभिलेखावर आली आहे. परंतु वादीने जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेल्या दुसऱ्या अपिलाचे काय झाले याबाबत काहीही नमूद केले नाही. अशावेळेस वादी जिल्हाधिकारी समोर असलेल्या दुसऱ्या अपिलामध्ये  तसेच सदर न्यायालय अशा दोन्ही मंचावर एकाच बाबीसाठी दाद मागत आहे असे दिसून येते. अशावेळेस जिल्हाधिकारी यांच्यासमोरील कार्यवाही पूर्ण झाल्याशिवाय, वाटप तक्त्याबाबतच्या स्थितीबाबत अंतिम निर्णय होऊ शकत नाही. तसेच सदर न्यायालयासमोर वादीने नमूद केलेले कथन व प्रतिवादीने नमूद केलेले कथन पडताळण्याकरीता कुठलेही कागदपत्र वादी अथवा प्रतिवादीने ७/१२ व नोटीस वगळता दाखल केलेले नाहीत. त्यामुळे वादीने

केलेल्या अर्जातील कथनाबाबत संदिग्धता निर्माण होते. अशावेळेस प्रथमदर्शनी तथ्य वादीच्या बाजूने सोईच्या पारडयासह दिसून येत नाही. तसेच अपरिमित नुकसानही दिसून येत नाही. परिणामतः वादीचा अर्ज मान्य होण्यास पात्र ठरत नाही. करीता पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. नि.क्र.५ खालील अर्ज नामंजूर करण्यात येते.

२. पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

३. अर्जाचा खर्च अर्जदारावर बसविण्यात येतो.

दि. ३०/०८/२०१८

(भा. अ. कडूस्कर)
२रे सह दि.न्या.व.स्तर, पंढरपूर

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Y. V. Sital (Jr. Clerk) |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 30/8/2018 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 30/8/2018 |
| Judgment/Order uploaded on | : | 30/8/2018 |